# जे जे चा अनभिज्ञ वारसा

लेखाचे शिर्षक वाचून थोडस आश्चर्य वाटेल.जे जे कला महाविदयालयाचा वारसा म्हटलं की फक्त चि्रत्रकला पेटींग व स्कल्पचर यांचाच विचार केला जातो कलामहाविदयालयात मुख्य प्रवाहात हेच दोन विभाग नेहमी येतात तुलनेने आर्टस ॲन्ड क्राफ्ट व कला शिक्षक प्रशिक्षण विभागांना तेवढ प्राधान्य दिले जात नाही.असे माझे प्रामुख्याने मत आहे.मी स्वतः कलामहाविदयालयात शिकत असताना ह्या. विभागाशी कधीच सबंध आला नाही परंतू डिप ए एड ला प्रवेश घेतल्या नंतर व पुढे याच विभागात अधिव्याख्याता म्हणून नियक्ती झाल्यावर येथील अवाका ध्यानात आला व हा विभाग कला क्षेत्रात कसा महत्त्वाचा आहे हे लक्षात येवू लागले.

कला शिक्षक प्रशिक्षण विभाग सर ज.जी.कला महाविदयालयातील एक महत्त्वाचा तसेच नुकतेच १00 वर्षे पुर्ण झालेला हा विभाग यामध्ये आर्ट टिचर डिप्लोमा□डिप्लोमा इन आर्ट एज्यु□ आर्ट मास्टर दरवर्षी अंदाजे १00 विदयार्थी या विभागात शिक्षण घेतात. १९३९ साली या विभागात पहिली गॅझेटेड पोस्ट भरली. संपूर्ण महाविदयालयातील ही पहिलीच गॅझेटेड पोस्ट प्रा.धोंड यांची भरती केली गेली ही कला शिक्षक प्रशिक्षण विभागात □संदर्भ 'रापण' लेखक श्री प्र.धोंडे□अशी कला शिक्षक परंपरा आहे.

कला शिक्षक प्रशिक्षण विभागात नेमकं काय होत या ठिकाणी चित्रकला शिक्षक घडविला जातो. चित्रकला आणि शिक्षक या दोन्हीचे संस्कार या ठिकाणी दिले जातात व कला शिक्षक घडविला जातो. चित्रकलेचे कौशल्य आत्मसात करून शिकविण्याचे धडे इथला विद्यार्थि शिक्षक घेतो व पुढे शालेय शिक्षणात कलेच्या माध्यमाने स्वतःचे स्थान निर्माण करतो.बालचित्रकला वृद्दिंगत घेण्यासाठी झटत रहातो.

कला शिक्षणात सृजनात्मक कलेचा हा सुचित अभ्यासकम लवचिक स्वरूपाचा असुन त्यात समायोनाच्या दृष्टीने बदल करण्यात भरपुर वाव आहे. तसेच स्थानिक परिसरात ज्या कृती केल्या जातात व ज्यांच्या वारसा मुलांना साहजिक पणे मिळतो अशा कृती हे शिक्षक कला शिक्षणातून करवून घेतात अभ्यासकमात दृश्य □रूपण □उपयोजित आणि प्रायोजित अशा चा प्रमुख क्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे.माध्यमे व साहित्य स्वतःच हाताळून निर्मिती करण्याच्या बालकाच्या क्षमतेनुसार प्रत्येक क्षेत्रातील कार्यकम (श्रेणी ) सुचविली आहे. बालक जसे जसे वाढेल तसे तसे

त्याच्या सृजनशील विचारांना आत्माविष्काराला साधने वापरण्याच्या कौशल्याला व निरीक्षण अधिक धार धार करण्याला चालना दिली जाते बालकलेचे महत्त्व हे शिक्षण क्षेत्रात आहे त्याचे धडे हाच काला शिक्षक देत असतो. मुलांच्या या सहज विकासाचा मानसशास्त्रीय पद्धतीने गंभीर परामर्शघेता चित्रकालेचा क्षेत्रात बालकलेचे महत्त्व अबादीत आहे. आदिमानवाची कला किंवा लोककला या जशा पुर्णार्थात कला नसुनही त्याना कलेत विशिष्ट महत्त्व आहे तसेच ते बालचित्रकलेलाही आहे सामान्य रसिकाला ही चित्रे भुरळ तसेच प्रतिभालेत चित्रकाराचाही लक्षवेध करताात.

कलेच्या दृष्टीने बालकलेचे महत्त्व कशामध्ये व कितपत याची चर्चा होणे महत्त्वाचे आहे तसेच मुख्यप्रवाधीत कला व बालकला काय समानता व फरकही लक्षात घेणे महत्त्वाचे ठरेल .

सौंदर्यवाद हा आजचा आपला कलानियमांचा आधार आहे.

सौंदर्याकृती आणि कलाकृती यांमध्ये आजची कलानिमांसा भेद मानते शंख शिंपले किटक इत्यादी मध्ये सौंदर्य आढळते तसेच कलाकृती मध्ये ही आढळते. पण त्यांना कलाकृती म्हणता येणार नाही. सौंदर्याकृती या निसर्गाचे देण असतात तर कलाकृती जाणिवेच्या एका विशिष्ट अवस्थेमध्ये जन्मलेली मानव निर्मित सौंदर्याकृती असते.

कलेच्या निर्मितीत आणि आस्वादात सहदयतेला अनन्य साधारण महत्व आहे आणि ही सहदयतेला कलावंतामध्ये असते तशीच ती बालकांमध्येही असते.म्हणूनच प्रत्येक बालक हा एका ठराविक मर्यादित निश्चितपणे कलावंत असतो.बालकाने आपल्या हदयविश्वात पाहिलेला आणि कागदावर गिरविटलेला आकार मोलाचा ठरतो तो त्याच्या धारधार संवेदनागुणामुळे त्याने रेखाटलेले आगगाडीचे इंजिन त्याने रंगविलेले फुल आणि त्याने पाहिलेला व चितारलेल रंगमंच ही प्रौढ कलावंतालाही भुरळ पाडू शकतात ती त्यातील भेदक व वेधक संवेदनेमुळे

बालकांच्या शिक्षणासंबंधी आपणा सर्वानांच विशेष आस्था आहे कारण आस्था आहे कारण आपण स्विकारलेल्या लोकशाहीनिष्ठ जिवनपध्दतिचा तो पाया आहे पुढे हेच बालक प्रत्येक क्षेत्रात देशाच प्रतिनिधित्व करताना दिसणार आहेत आपण चित्रकला क्षेत्रात शालेय जिवनात कलात्मक संस्कार रूजविण्याचे मुख्य काम हे कला शिक्षक करित असतात. कोणत्याही चांगल्या शालेय कला कार्यक्रमात प्रत्येक बालकाला सुप्त शक्तीचा परिपूर्ण विकास साधण्यासाठी व्यवस्थापक शिक्षक व पालक या सर्वानी मिळून एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे. उत्तम विकासाकरिता लागणारे भावपूर्ण आत्मीयतेचे वातावरण निर्मान करणे हे शिक्षकाचे काम आहे.वर्गा

तील भौतिक परिसरात कलाविषयक संवेदनशीलता आणि अभिरूची प्रतिबिंबित व्हावयास हवी तो परिसर सुव्यवस्थित व आकर्षक करण्यात सहभागी होण्यासाठी मुलांना योग्य ते मार्गदर्शन करणे जरूर आहे. कामाबददलची आस्था व त्याचा रंगतदार पणा वृध्दिंगत करण्यासाठी मुलांनी केलेल्या कलाकृतीचा वरच्यावर व आलटुन पालटुन उपयोग केला जावा.

अशा पद्धतीने मुलांमध्ये असलेल्या उपजत गुणांना ओळखून यांना संवेदनशील व आस्वादक बनविण्याची क्षमता हे शिक्षक वाढवितात तसेच कलानिर्मितीच्या अनुभवांत विदयार्थ्यांना सहभागी करवून बालकांच्या सृजनशक्तीच्या विकास मानसशास्त्रीय ज्ञान वाढविण्यास मदत करतात.

कला शिक्षक प्रशिक्षण विभागातून कला शिक्षक हे विरूद घेवून बाहेर पडणा या शिक्षकांनी आजपर्यंतची संख्या अगणित आहे १00 वर्षे ही परंपरा अखंड सुरू आहे जे जे तून प्रशिक्षित झालेले अनेक कला शिक्षक संपूर्ण महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर कार्यरत आहेत व ज . जी कला महाविदयालयासाठी विदयार्थ्यी घडवित आहेत कला महाविदयालयाद्दल आस्था व आदर या ठिकाणीच निर्माण केला जातो व वर्षानुवर्ष यातील अनेक विदयार्थी जे जे चित्रकार होण्याची स्वप्ने घेऊन येत आहेत हे चक असेच फिरत राहील .

येथे यश मिळविणारा विदयार्थी कला प्रतांत चमकरणारा चित्रकार या सर्वांच्या मागे दूर कुठेतरी एक चित्रकला शिक्षक प्रेरणादांयी ठरलेला आहे.

-स्मिता किंकळे